**सत्र खटला क्र.५७/२०२३.**
**सरकार <u>विरूद्ध</u> सैय्यद शरीफ**
**गुन्हानोंद क्र.२३२/२०२३, अकोटशहर पोलीसठाणे.**
**गुन्हे : भारतीय दंड विधान कलम ३७६ (२) (एन), ३५४ (डी), ३८६, ५०६ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ई) अन्वये.**
**सी.एन.आर.क्र. एमएचके.०५–०००४३३–२०२३.**

.....................................................................................................

## <u>निशाणी क्र.५ खालील आदेश</u>.

**(दिनांक ०५.१२.२०२३.)**

सदरचा आदेश मी या अर्जालगतच पारित करीत असल्यामुळे त्यातील मजकूर नमूद करण्याचे कारण नाही.

२. सदर अर्जास तपासणी अधिकाऱ्यांचे वादाचे म्हणणे निशाणी क्र.६ प्रमाणे, विद्वान साहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे वादाचे म्हणणे निशाणी क्र.७ प्रमाणे, तर मूळ फिर्यादी/पीडिता हिचे वादाचे म्हणणे निशाणी क्र.८ प्रमाणे आहे. वादाच्या या तिन्ही म्हणण्यांतील मजकूर खालीलप्रमाणे.

आरोपीविरूद्धचे गुन्हे गंभीर आहेत. स्त्री अत्याचाराशी संबंधित आहे. आरोपीस जामीन दिल्यास तो पुन्हा असेच गुन्हे करेल. त्यास कायद्याचा धाक राहणार नाही. तो फिर्यादी/पीडितेवर प्राणघातक हल्ला करू शकतो. तिला व साक्षीदारांना साक्ष देण्यापासून परावृत्त करू शकतो. सदरच्या गुन्ह्यास कमीत कमी १० वर्षांची, मात्र जन्मठेपेपावेतो देता येईल अशी कठोर शिक्षा प्रस्तावित आहे. आरोपीचा जामिनासाठीचा आधीचा अर्ज गुणवत्तेवर फेटाळण्यात आला आहे. म्हणून हा देखील अर्ज फेटाळावा, अशी सर्वांची विनंती आहे.

३. वरीलप्रमाणे अर्ज निशाणी क्र.५ पाहिला. तपासणी अधिकाऱ्यांचे, सरकारी अभियोक्ता यांचे, तसेच फिर्यादी/पीडितेचेही वादाचे म्हणणे पाहिले. प्रथम माहिती अहवाल पाहिला. संपूर्ण अभिलेख पाहिला. उभयपक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

४. आरोपीविरूद्धचे आरोप खरोखरीच गंभीर स्वरूपाचे, महिलेविरोधी आहेत. शिवाय, गुन्ह्यास जन्मठेपेपावेतोची शिक्षाही आहे. आरोपीची गुन्हे करण्याची मानसिकता व पद्धत काहीशी क्रूर स्वरूपाची आहे, हा व अशा आशयाचा विद्वान सरकारी वकिलांचा युक्तिवाद जवळपास स्वीकारार्ह आहे. म्हणून तर आरोपीचा प्रथम जामीनअर्ज फेटाळण्यात आला आहे. मात्र त्यावेळी तपास पूर्ण होणे बाकी होते. आता तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र देखील न्यायालयात दाखल झाले आहे. अर्थातच, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविण्यात आली आहेत.

५. गुन्हे महिलाविरोधी, लैंगिक अत्याचाराचे आहेत, हे खरे. मात्र, यातील पीडिता ३८ वर्षांची पूर्ण प्रौढ स्त्री आहे, हे ध्यानात घ्यावे लागणार आहे. ती अकोट येथे राहते. आरोपी मुक्ताईनगर, जळगांव येथे राहतो. फेसबुक या समाजमाध्यमावर उभयतांची आधी ओळख, नंतर मैत्री व नंतर प्रेमसंबंध झाले. त्यानंतर उभयतांच्या भेटी झाल्या. त्यानंतर शारीरिक संबंध झाले व नंतर आरोपीने तिच्याकडून थोडे थोडे करून रूपये ३,७०,०००/— उकळले, कारण उभयतांच्या शारीरिक संबंधाची छायाचित्रे व चित्रफिती समाजमाध्यमावर प्रसारित करण्याच्या धमक्या आरोपीने दिल्या, असे एकूण फिर्यादीचे तिच्या फिर्यादीत कथन आहे.

६. फिर्यादीचे फिर्यादीतील कथन पाहता, आपण काय करीत आहोत, त्याचे परिणाम काय होऊ शकतात, याची जाणीव प्रौढ वयाच्या फिर्यादीस सुरूवातीपासूनच असणे अपेक्षित आहे. ती ३८ वर्षे वयाची आहे. १७—१८ वर्षे वयाची दोन मुले तिला आहेत. तिचे पती व्यावसायिक आहेत. आरोपीसोबत फेसबुकवर ओळख, नंतर मैत्री, नंतर प्रेमसंबंध होत असतांना या सर्व तथ्यात्मक परिस्थितीची जाण व भान फिर्यादीने ठेवले नाही. शिवाय, नंतर आरोपीने सर्वात प्रथम भेटायला बोलाविले तेव्हा व घरी येउन शारीरिक संबंधांची मागणी केली तेव्हा देखील तिने त्याबाबत तिच्या पतीला किंवा अन्य कोणास सांगितले नाही. दिनांक ०२.०२.२०२० पासून चालत असलेल्या या संबंधांबाबतची फिर्याद तिने दिनांक ०७.०६.२०२३ रोजी नोंदविली. तीन वर्षांतील आरोपीसोबतचे तिचे सर्वच संबंध केवळ आरोपीच्या धमक्यामुळेच झाले असल्याचे म्हणता येणार नाही. सुरूवातीचे तर नक्कीच नाही.

७. आता तपास पूर्ण होउन दोषारोपपत्र दाखल झाल्यामुळे आरोपीची तपासाकामी उपयोगिता संपली आहे. खटल्याच्या अंतिम निकालापावेतो, म्हणजे अनिश्चित कालावधीपावेतो त्याला कारागृहात ठेवण्याने काहीच साध्य होणार नाही. या सर्व तथ्यात्मक परिस्थितीमुळे जामीन मिळण्यास आरोपी पात्र असला तरी, त्याच्याही विरोधी जाणारे काहीएक घटक आहेत. ते म्हणजे आरोपीविरूद्ध मुक्ताईनगर, अकोट, मलकापूर इ. ठिकाणी वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. त्यावरून त्याच्याविरूद्ध न्यायालयांत खटले देखील चालू आहेत. मुक्ताईनगर येथील खटला तर भारतीय शस्त्र कायद्याचे कलम ४ सह २५ प्रमाणे चालू आहे. अर्थातच, आरोपी सराईत असल्याचे म्हणण्यास आधार आहे.

८. शिवाय, तो परजिल्हयात राहणारा आहे. फिर्यादी महिला आहे. सुरूवातीस तिच्या स्त्रीसुलभ सौजन्याचा फायदा व नंतर गैरफायदा आरोपीने घ
ेतला आहे, हे प्रथमदर्शनी उघड आहे. फिर्यादी सज्ञान प्रौढ असली तरी, नंतरचे तिचे धमक्या देऊन केलेले शोषण नक्कीच तिच्या खुल्या स्वेच्छा संमतीशिवाय, मर्जीविरोधी असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. या देखील सर्व तथ्यांचा विचार करून, जामीन देतांना आरोपीवर काहीएक अटी लादणे आवश्यक आहे.

९. मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>.**

१. सदरचा अर्ज निशाणी क्र. ५ मंजूर करण्यात येत आहे.

२. अकोटशहर पोलीसठाण्याचा गुन्हानोंद क्र. २३२/२०२३ या कामी अर्जदार आरोपी सैय्यद शरीफ सैय्यद शफी यास रु.५०,०००/— (अक्षरी रुपये पन्नासहजार फक्त) चे व्यक्तिगत बंधपत्र व तेवढ्याच रकमेच्या योग्य व लायक जामिनदारांच्या बंधपत्रावर आणि रु.३०,०००/— (अक्षरी रुपये तीसहजार फक्त) रोखीची सुरक्षाठेव न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर जामीन मंजूर.

३. आरोपीने फिर्यादीशी व कुणाही साक्षीदाराशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्क करू नये, असे आदेशित करण्यात येत आहे.

४. या खटल्याची संपरिक्षा पूर्ण होईपावेतो आरोपीने केवळ या खटल्याच्या संपरिक्षेच्या न्यायालयातील नियत तारखांच्या दिवशीच अकोटशहरात न्यायालयात येण्याजाण्यापुरताच प्रवेश करावा. एरवी आरोपीने अकोटशहरात प्रवेश करू नये. नियत तारखेचे खटल्याचे कामकाज पूर्ण होताच आरोपीने त्वरित अकोट शहर सोडावे.

५. या खटल्याच्या संपरिक्षेकामी आरोपीने नियमित उपस्थित राहावे.

६. वरील अटीशर्तीपैकी कुठल्याही अटीशर्तींचा भंग झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आल्यास हा जामीन आदेश रद्दबातल करण्याबाबत विचार होईल.

(चकोर श्रीकृष्ण बाविस्कर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.

दिनांक : ०५.१२.२०२३.

सत्र खटला क्र.५७/२०२३.
नि.क्र.५खालील आदेश.